महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन ज्ञापन क्रमांक– पोप्रमा-१०१६/प्र.क्र.७२०/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : २८ सप्टेंबर, २०१७.

<u>विषय</u> :- कर्जत पोलीस ठाणे याच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील पोलीस दूरक्षेत्र, सिध्दटेक, तालुका-कर्जत, जिल्हा-अहमदनगर, याच्याकरिता नवीन इमारतीचे बांधकाम करण्यास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

<u>संदर्भ</u> :- १) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१४/ प्र.क्र.४९/ १४/ विनियम, दिनांक ०५.०१.२०१५.

२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.

३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे पत्र क्र. पोमसं/ २७-बी/ २८-बी-२/ कर्जत-दू.शे.बांध-अहमदनगर/ ६८/ २०१५, दिनांक ०६.०२.२०१६.

ज्ञापन-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांनी कर्जत पोलीस ठाणे याच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील पोलीस दूरक्षेत्र, सिध्दटेक, तालुका-कर्जत, जिल्हा-अहमदनगर, याच्याकरिता नवीन इमारतीचे बांधकाम करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

२. उक्त कामासाठी सहायक अभियंता, श्रेणी-१, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कर्जत, यांनी सन २०१४-१५ च्या जिल्हा दरसूचीनुसार तयार केलेले रु.५१,५२,९२२/- इतक्या खर्चाचे अंदाज सादर केले आहे. उक्त खर्चाचे अंदाज कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर व पोलीस अधीक्षक, अहमदनगर, यांनी सांक्षाकित केले आहेत.

३. उक्त खर्चाचे अंदाज सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी तपासले आहेत व ते **रु.५७.५२ लक्ष** असे सुधारित केले आहेत आणि विवक्षित अटींवर प्रशासकीय मान्यता देण्यास सहमती दिली आहे.

४. त्या अनुसार, कर्जत पोलीस ठाणे याच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील पोलीस दूरक्षेत्र, सिध्दटेक, तालुका-कर्जत, जिल्हा-अहमदनगर, याच्याकरिता नवीन इमारतीचे बांधकाम करण्यासाठी **रु.५७.५२ लक्ष** इतक्या खर्चाच्या अंदाजास, पुढील अटींवर, याद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे:-

१) बांधकामाचा नमुना नकाशा, मांडणी नकाशा आणि विस्तृत नकाशा यांना वास्तुविशारदाकडून मंजूरी घेऊनच काम सुरु करावे.

२) काम सुरु करण्यापूर्वी जागेच्या मालकी हक्काबाबतची पूर्तता करुन घ्यावी.

३) ढोबळ स्वरूपात धरण्यात आलेल्या तरतुदींबाबत विस्तृत खर्चाचे अंदाज मंजूर करुनच काम हाती घ्यावे.
४) प्रत्यक्ष काम करताना शासन निर्णय, पर्यावरण विभाग, क्र.इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/तां.क.१, दिनांक १०.०१.२०१४, अनुसार कार्यवाही करावी.
५) निधी उपलब्ध झाल्याशिवाय बांधकामास सुरवात करु नये.

५. उक्त कामासाठी येणारा खर्च हा गृह विभाग--मागणी क्रमांक बी-१०, ४०७०, इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च, (००) ८००, इतर खर्च, (००)(११) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण पोलीस विभागाच्या कार्यालयीन इमारतीचे बांधकाम करणे, (४०७० ०२११), ५३, मोठी बांधकामे, याखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हे ज्ञापन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४४०/इमा-२, दिनांक २४.१०.२०१६, अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. हे शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१७०९२८१७४३३८३७२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Gopal Borse

Digitally signed by Swapnil Gopal Borse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=66835707253ff77ef0e333eb3ad582f9b876d443b2654088832e43dcad21c52a, cn=Swapnil Gopal Borse
Date: 2017.09.28 17:33:18 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक.
३) पोलीस अधीक्षक, अहमदनगर.

प्रत :-

१) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडल, अहमदनगर (*सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी दिलेल्या "Recapitulation Sheet" च्या प्रतीसह).*
२) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर (*सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी दिलेल्या "Recapitulation Sheet" च्या प्रतीसह).*
३) जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर.
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
५) कार्यासन अधिकारी (इमा-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) कार्यासन अधिकारी, वित्त विभाग (व्यय-७), मंत्रालय, मुंबई.
७) निवड फाईल (पोल-७).